महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २३७ वा | दिनांक : १७/०७/२०२५ | वार : गुरूवार

## उद्धव ठाकरेंना सत्तेत येण्याचा संधी - मुख्यमंत्र्यांचे सूचक विधान



**मुंबई :** विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा आज विधानपरिषदेत निरोप समारंभ पार पडला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दानवे यांचे कौतुक केले, त्याचसोबत हलकी टोलेबाजी देखील केली. उद्धव ठाकरे देखील यावेळी सभागृहात उपस्थित होते. यावेळी फडणवीसांनी ठाकरे यांना तुम्हाला इकडे यायचा पूर्ण स्कोप आहे, त्यावर आपण वेगळ्या पद्धतीने चर्चा करू असे सूचक विधान केले. त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, जोपर्यंत राहुल गांधी युवा नेता राहू शकतात तोपर्यंत आपण दोघेही युवा राहू शकतो, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंबादास दानवे यांना निरोप देताना म्हटले. अंबादास दानवे यांची राजकीय सुरुवात भाजपमधूनच सुरू झाले आहे. शिवसेनेत गेल्यानंतर त्यांनी विविध पदांवर काम केले. पत्रकारितेचा अभ्यास त्यांनी केले आहे. त्यामुळे अपेक्षा अशी होती की ते बातम्या संकलित करतील, पण ते बातम्या निर्माण करणारे झाले. एक चांगला नेता या सभागृहाला मिळाला. भाजपच्या मुशीत वाढल्यामुळे त्यांच्यात चिकाटीपणा पाहायला मिळते, संघटन कौशल्य पाहायला मिळते आणि संघटन कौशल्य पाहायला मिळते.

सामान्यांच्या प्रश्नांची जाण अंबादास दानवे यांना आहे. २०१९ ला ज्यावेळेस ते या पदासाठी निवडणूक लढले तेव्हा आम्ही सगळे एकत्र होतो आणि आम्ही पाठिंबा दिला होता. त्यांचा कार्यकाळ या ठिकाणी संपुष्टात येईल त्यानुसार विरोधी पक्षनेत्याचे देखील या ठिकाणी कार्य संपुष्टात येईल. त्यामुळे आता परब साहेब तयारी करून ठेवा, असे म्हणत फडणवीस यांनी अनिल परब यांना डिवचले.

विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी अनेक प्रश्नांना हात घातला आहे. मी स्वतः देखील विरोधी पक्षनेता होतो, माझी तर पीएचडी आहे विरोधी पक्ष नेता म्हणून कसे काम करायचे. उद्धव ठाकरे यांना उद्देशून बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, उद्धवजी आता २०२९ पर्यंत काही करायचे नाही. आम्हाला तिकडे यायचा स्कोप उरला नाही. मात्र तुम्हाला इकडे यायचा स्कोप आहे. त्यावर वेगळ्या पद्धतीने विचार करता येईल. आपण वेगळ्या पद्धतीने बोलू.

अजित पवार म्हणाले, अंबादास दानवे यांनी २०२२ पासून विरोधी पक्षनेता म्हणून केलेल्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करतो आणि अभिनंदन करतो. त्यांचा पुढील राजकीय कारकीर्दीसाठी शुभेच्छा देतो. अधिवेशनात काय भूमिका मांडावी यावर आम्ही अनेकदा चर्चा केली आहे. नगरसेवक पदावरून थेट इथपर्यंत त्यांनी झेप घेतली आहे. अंबादास दानवे नशीबवान आहेतच त्याच सोबत त्यांचे कर्तुत्व देखील आहे. संसदीय लोकशाही व्यवस्थेत विधिमंडळाला महत्त्व आहे. त्यात विधान परिषदेतला वेगळे स्थान असून इथल्या विरोधी पक्षनेत्याला देखील मोठे स्थान आहे.

## जितेंद्र आव्हाड गोपीचंद पडळकर यांच्यात राडा



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड व सत्ताधारी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यात आज विधानभवनाच्या गेटवर जोरदार बाचाबाची झाली. यावेळी आव्हाड यांनी पडळकर यांच्यावर गाडी अंगावर घालण्याचा आरोप केला. यामुळे या घटनेचे गांभिर्य वाढले आहे. विधानभवनाच्या गेटवरच हा प्रकार घडल्यामुळे तिथे मोठी गर्दी जमली होती.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार तथा मुख्य प्रवक्ते जितेंद्र आव्हाड यांनी गत आठवड्यात विधिमंडळ परिसरात भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्याकडे पाहून 'मंगळसूत्र चोरांचा' अशी घोषणाबाजी केली होती. यामुळे पडळकर चांगलेच संतापले होते. या घटनेला ५ दिवस लोटत नाहीत तोच आज विधान भवनाच्या गेटवर या दोन्ही नेत्यांत पुन्हा बाका प्रसंग उद्भवला.

त्याचे झाले असे की, जितेंद्र आव्हाड विधिमंडळ प्रवेशद्वाराच्या जवळून पायी जात होते. त्यावेळी आमदार गोपीचंद पडळकर यांची गाडी थेट त्यांच्या दिशेने आली. यावेळी पडळकर यांच्या गाडीचा दरवाजा आपल्याला लागल्याचा आरोप आव्हाड यांनी केला. त्याचा जाब त्यांनी पडळकरांना विचारला. यावेळी दोन्ही नेत्यांत चांगलेच वाक्युद्ध रंगले. मी एकटाच आहे. कधीही ये. तुझ्यासारखी अशी कुत्री घेऊन मी फिरत नाही, असे पडळकर यावेळी म्हणाले. त्यावर जितेंद्र आव्हाड यांनीही त्यांना त्याच शब्दांत प्रत्युत्तर दिले. मी आयुष्यभर मुंबईत राहिलो. धमकी कुणाला देतो, असे ते म्हणाले.

जितेंद्र आव्हाड यांनी त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना पडळकरांनी माझ्या अंगावर गाडी आणल्याचा आरोप केला. मी मंगळसूत्र चोर म्हणालो होतो. त्याचा राग गोपीचंद पडळकर यांना का यावा? त्यांनी माझ्या अंगावर गाडी का आणली? त्यांनी माझ्या दिशेने गाडी आणली नसती तर हे प्रकरण घडले नसते, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनीही पडळकर यांच्याविषयी बोलताना अत्यंत शिवराळ भाषेचा वापर केला.

हा काय बालिशपणा आहे. त्यांनी दरवाजाला लाथ मारली. त्यानंतर तो दरवाजा मला लागला. अशा छोट्या-मोठ्या गोष्टींकडे कोण लक्ष देते म्हणून मी पुढे आलो. मी आयुष्यभर मुंबईत राहिलो. पण ही कुठली पद्धत आहे? आमच्या अंगावर गाड्या घालायच्या? कोण ऐकूण घेणार? कशाला आमच्या अंगावर गाडी घालायची? व्हिडिओत दिसेलच काय झाले ते. यापूर्वीही असेच झाले होते. जाणिवपूर्वक खोड काढायची. तुम्हाला एवढा राग का येतो? तुम्हाला एवढे वाईट का वाटावे? असेही आव्हाड यावेळी बोलताना म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार व त्यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांच्यावर अश्लाघ्य शब्दांत टीका केली होती. सासू ख्रिश्चन, नवरा ब्राह्मण, बाप मराठा व आई दुसरीच असे एक कॉकटेल घर पुण्यात आहे, असे ते म्हणाले होते. यावेळी त्यांनी पवार कुटुंबीयांचे नाव घेतले नव्हते. पण त्यांचा रोख त्यांच्याच दिशेने होता. आमदार जितेंद्र आव्हाड यांनी गत आठवड्यात त्यांच्या जवळून जाताना मंगळसूत्र चोर अशी नारेबाजी करत त्यांच्या टीकेला जशासतसे प्रत्युत्तर दिले. त्याचा वचपा आज गोपीचंद पडळकर यांनी काढल्याची चर्चा विधिमंडळ परिसरात रंगली होती.

## दानवेंनी भरलेल्या ताटाशी प्रतारणा केली नाही- उद्धव ठाकरे



**मुंबई :** विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आपल्या कारकिर्दीत केव्हाही भरलेल्या ताटाशी प्रतारणा केली नाही, अशा शब्दांत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना टोला हाणला. अंबादास दानवे यांच्या एक निस्वार्थी शिवसैनिक आहेत. त्यांनी आतापर्यंत कोणत्याही पदाच्या लालसेशिवाय काम केले. कोणत्याही व्यक्तीला जनतेप्रती असणारी निष्ठा त्यांना एक नवी उंची प्रदान करते. दानवे यांनी ही उंची प्राप्त केली आहे. ही उंची ते आपल्या स्वभावानुसार आणखी वाढवतील, असे ते म्हणाले.

विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची टर्म पुढील महिन्यात संपुष्टात येणार आहेत. आज त्यांना सभागृहाने निरोप दिला. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी त्यांचे तोंडभरून कौतुक केले. ते म्हणाले, आज आपल्या सभागृहाचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आपल्या पहिल्या कारकिर्दीची टर्म पूर्ण करत आहेत. ही टर्म पूर्ण करताना अंबादास दानवेंनी मी पुन्हा येईन असे म्हणावे. त्याला एक वेगळे महत्त्व आहे. पण त्यांनी आमच्याच पक्षातून यावे.

मला अंबादास दानवेंचे कौतुक ऐकताना फार बरे वाटले. कारण, काहीजण असे आहेत की, आज ते त्यांचे कौतुक करत असले तरी, मी त्यांना जेव्हा उमेदवारी दिली होती, तेव्हा त्यांचे चेहरे जरा वेगळे होते. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो. तुम्ही भाजप किंवा संघाच्या मुशीत तयार झालेला एक चांगला कार्यकर्ता मला दिला. आत्ता त्यांनी माझे अनेक नेते घेतलेत. त्यामुळे ते मला धन्यवाद देतील की नाही याविषयी शंका आहे.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, अंबादास दानवे यांचा मला अभिमान आहे. आपण किती शिकलो यापेक्षा काय शिकलो व त्याचा उपयोग जनमाणसाला कसा केला हे महत्त्वाचे आहे. पदे येतात व जातात. पण शेवटी जनतेच्या मनात आपली प्रतिमा काय म्हणून राहते हे आपल्या आयुष्याचे फलित असतात. अनेकजण पदासाठी धडपड असतात. ते टिकवण्याचा प्रयत्न करत असतात. मघाशी इथे उल्लेख झाला त्यानुसार अंबादास तुम्ही तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आला नाहीत, पण भरलेल्या ताटाशी प्रतारणाही केली नाहीत. ज्यांनी ताट वाढून दिले त्या पक्षाशी प्रतारणा तुम्ही केली नाही. यासाठी खास तुम्हाला सगळी जनता धन्यवाद देत असेल.

तुमच्या कल्पकतेचे मुख्यमंत्र्यांनीही कौतुक केले. हा माणूस फार कल्पक आहे. ते साधे शिवसैनिक होते तेव्हापासून मी त्यांच्याकडे पाहतो. ते सतत काही ना काहीतरी करत असतात. अभिनव पद्धतीने करत असतात. मला शिवसेनाप्रमुखांनी ज्या काही गोष्टी मला सांगितल्या, त्यात एक गोष्ट मुद्दाम सांगितली पाहिजे. ते म्हणाले होते, उद्धव मुख्यमंत्री पद हे महत्त्वाचे असतेच, पण विरोधी पक्षनेतेपदही तेवढ्याच तोलामोलाचे किंवा काकणभर जास्त जबाबदारीचे असते. विरोधी पक्षनेता हा आक्रमक असला पाहिजे, पण आक्रस्ताळ असता कामा नये. आपल्याकडे अनेकदा आक्रमकपणा व आक्रस्ताळपणा यांच्यातील सीमारेषा पुसली जाते. आपण जे काही करतो ते त्याला आपण आक्रमकपणा म्हणतो, पण प्रत्यक्षात तो आक्रस्ताळपणा असतो, असे ते म्हणाले.

या सभागृहाचे विरोधी पक्षनेतेपद अनेक मोठ्या विचारवंतांनी भूषवले आहे. त्यात आता अंबादास दानवे यांचा समावेश झाला आहे. कुणीही चटकन विरोधी पक्षनेते म्हणून त्यांचे नाव घेईन, असे ठाकरे यावेळी मृणालताई गोरे यांची आठवण काढताना म्हणाले.

ते पुढे म्हणाले, अंबादास दानवे नेहमीच जिथे कुठे अन्याय होईल तिथे स्वतः जातात. अनेकदा मला त्यांचा फोन येतो. त्यात ते मी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या घरी आहे किंवा एखाद्या हत्या झालेल्या मृत व्यक्तीच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेत असल्याचे सांगतात. ते माझी त्यांच्याशी चर्चाही करून देतात. अंबादास दानवे मागच्या आठवड्यात घरी आले होते. तेव्हा मी त्यांना म्हणालो, अंबादास आता तुमची टर्म संपत आहे. मी तुम्हाला आताच काही देऊ शकत नाही. त्यावेळी त्यांनी दिले तेवढे खूप आहे, मी काही मागण्यासाठी आलोच नाही असे म्हणाले. त्यामुळे हा शिवसैनिक माझ्याकडे कोणतेही पद मागायला किंवा ते टिकवायला आला नाही हे मी अभिमानाने सांगतो.

हा शिवसैनिक आपली विधानपरिषदेतील कारकिर्द यशस्वीपणे पूर्ण करत आहे. मला खात्री आहे की, अंबादास दानवे यांच्यासारखे कार्यकर्ते जिथे कुठे असतील तिथे ते कोणत्याही पदाच्या स्वार्थीशिवाय आपले काम करत राहतात. त्यांच्यात जनतेप्रती असणारी निष्ठा एक नवी उंची प्रदान करत असते. अंबादास तुम्ही ती उंची प्राप्त केली आहे. ही उंची तुमच्या स्वभावानुसार निष्ठेने वाढवाल असा मला विश्वास आहे, असेही उद्धव ठाकरे यावेळी बोलताना म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १७ जुलै २०२५


## वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी येथे जागतिक युवा कौशल्य दिन साजरा




**ढोकी :** येथील वसंतराव काळे महाविद्यालय मध्ये १५ जुलै २०२५ रोजी 'जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त 'करिअर संसद पदाधिकारी शपथ ग्रहण समारंभ आयोजित करण्यात आला .महाराष्ट्र राज्य व उच्च तंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, मुंबई व महाविद्यालयातील करियर कट्टा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास फेरे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून करिअर कट्ट्याचे समन्वयक प्राध्यापक डॉक्टर माधव श्रीमंगले व प्राध्यापक डॉक्टर ज्योती नाडे हे उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रा. डॉ.ज्योती नाडे यांनी या कार्यक्रमाचा उद्देश विशद केला. विद्यार्थ्यांना यूपीएससी एमपीएससी परीक्षेसाठी करिअर कट्ट्याची मौलिक मदत होईल असे याप्रसंगी त्यांनी सांगितले. करिअर कट्ट्याच्या माध्यमातून आपला भविष्यकाळ निश्चितपणे उज्वल होऊ शकेल असेही त्यांनी यावेळी बोलताना मनोगत व्यक्त केले. समन्वयक प्रा. डॉ. माधव श्रीमंगले यांनी करिअर कट्टा योजनेच्या माध्यमातून IAS आपल्या भेटीला व उद्योजक आपल्या भेटीला या उपक्रमाच्या माध्यमातून करिअर कट्टा विभागाच्या कार्याची ओळख करून दिली. अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. हरिदास फेरे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व करिअर कट्ट्याचे महत्त्व विशद केले तसेच जागतिकीकरण उदारीकरण व खाजगीकरण होत असलेल्या या काळात प्रत्येक विद्यार्थ्यांनी अध्ययना व्यतिरिक्त कोणते ना कोणते कौशल्य आत्मसात करणे गरजेचे असल्याचे सांगितले. तसेच स्किल डेव्हलपमेंट कोर्स स्वतःच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्यासाठी अनिवार्य करावेच लागतील असे कथन केले.

यावेळी करिअर संसदेच्या अंतर्गत कुमारी साक्षी कावळे (मुख्यमंत्री), कुमार प्रज्वल भालेराव (नियोजन मंत्री), कुमारी किरण मोरे (कायदे व शिस्तपालन मंत्री), कुमारी साक्षी टेकाळे (सामान्य प्रशासन मंत्री), कुमारी मुस्कान पठाण (माहिती व प्रसारण मंत्री), कुमार सुशील शिंदे (उद्योजकता विकास मंत्री), कुमारीअंकिता घुले (रोजगार व स्वयंरोजगार मंत्री), कुमारीअंजली वाघमोडे (कौशल्य विकास मंत्री), कुमारी ज्ञानेश्वरी टेकाळे (संसदीय कामकाज मंत्री), कुमारी प्रतीक्षा कावळे (महिला व बालकल्याण मंत्री) व कुमारी नंदिनी धबाले यांची (सदस्य पदी) निवड करण्यात आली व शपथविधी कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी त्यांना नेमणूक पत्रे देण्यात आली व करिअर कट्टा दैनंदिनीचेही वाटप करण्यात आले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुस्तक परीक्षण




आदरणीय सन्माननीय कविराज "ज्ञानेश्वर गायके"कन्नड यांचा पेरणी हा काव्यसंग्रह त्यांनी मला स्वतः भेट घेऊन घरी आणून दिला त्याबद्दल त्यांचा शतशः आभारी आहे.. कवी ज्ञानेश्वर गायके यांचा काव्यसंग्रह हाती आला आणि कवींच्या भावभावनांचा जगण्याचा लेखणीचा कल लक्षात घेता "माझ्या कवितेने"यात कवी उमेद भरून सृष्टी सर्जन नवचैतन्य निर्माण करू पाहतात दुःखांचे कोंदनाचे भजन सज्ज दिसतात."झाड पडलं"या कवितेत झाडाबद्दलची कृतज्ञता व्यक्त करून आणि परोपकाराची भावना या ठिकाणी कवी सिद्ध करतात. "वाटण्या"या कवितेतून माणसातली मानवता बंधुता मातृदेवो भव पितृ देवो भव या सर्व गोष्टी काळ कसा हिरावून घेतो याचा दुःखद वर्णन कवी करताना दिसतात.. दिवाळी या कवितेमध्ये शेतकऱ्याच्या जीवनामध्ये येणारे दुःख आणि त्याची झालेली दशा याचं वास्तव्य या कवितेत आपणास दिसतं. "या मातीने"या कवितेत कृतज्ञ भाव ओतताना आपणाला कवी म्हणतात. या देशाचा बळीराजा मी..या ढेकळाचा दास झालो.. गाव या कवितेमध्ये वारकरी गाव माझं करी एकादशी वारी.. प्रत्येकाच्या घरामध्ये पारायण ज्ञानेश्वरी..अशा सुंदर गावाला आधुनिकतेने वेढल्यामुळे गावाचं गाव पण कसं निघून गेलं या कवितेत कवीने खंत व्यक्त केली. लेक लाडकी बापाची यात प्रत्येकाला लेक असायला हवी जीवनाच्या सुखदुःखाला सोबत लेकीची ही भावना कवी व्यक्त करताना दिसतात.. हिरवगार स्वप्न पेरण्यासाठी कवितेचे शस्त्र हाती घेतल्याचं कळविणे या ठिकाणी आपलं मत ठाम मांडले मास्तर व्हायचं राहून गेलं ही कवीची खंत त्यांनी आपल्या कवितेतून मांडतात.. "ते"या कवितेतून प्रारब्ध ला नजुमानता कर्माला प्राधान्य देताना कवी आपल्याला या ठिकाणी दिसतात. काय झालंय घराला.. काही आता कळत नाही घरातल्या भिंती पूर्वीसारख्या आता बोलत नाही..ही कवीची खंत घर असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती तिथे असावा प्रेम जिव्हाळा नकोत नुसती नाती हीच अनुभूती देतात. "माझी माय या कवितेमध्ये"माय जळली म्हणून दूर झाला अंधार माय घरात असता सदा उघडेच दार.. या ममतेच्या हृदयाला कवी शोधतात.. वारसदारांनो या कवितेमध्ये अधुऱ्या राहिलेल्या स्वप्नांना पूर्ण करण्याचं ओझं येणाऱ्या पिढीकडे असतं आणि त्यांना ते पूर्ण करावं हीच कवीची भावना छान पद्धतीने व्यक्त केली. "मळा चालला "आसवांचा आला पूर अन भरले धरण आम्हा निरोप देताना त्यास दिसते मरण..धरणामध्ये गेलेले शेती आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले हाल अपेष्टाच दुःखद वर्णन मला चालल्या कवितेत कवी भाव विणमुख होऊन करतात.. भीमा तुझ्या जन्माने.. या कवितेमध्ये समतेचे ,स्वातंत्र्याचे ,समानतेचे आणि स्वातंत्र्याचे धुमारे फुटतात आणि स्वप्न कसे पूर्ण झाली हे कवितेतून कवीने स्पष्ट केले.काळ्या रामासमुक्त करून पाणी सारे चवदार केले.. गुरु साठी कृतज्ञ भाव व्यक्त करत असताना..आपणच दिला आकार मज नर्मदेच्या गोटयासओळख आजची माझी आशीर्वाद तो तुमचाच... आई गेली तेव्हा सूर्य मावळला होता रात्रीच्या काळोखाला चंद्र घाबरला होता..ही आई प्रतीची कृतज्ञता व्यक्त करताना कवितेत दिसतात. बाकी तेवढं गाव राहील,, माणसं पेरायला शीक,, गाव बदलत आहे,, आणि गावाचं गावपण.. अशा एकापेक्षा एक सरस शब्द मोतीं ची पेरणी करून आदरणीय कविराज ज्ञानेश्वर गायके यांनी आपल्या शेतीमातीतील,, मानवतेची ध्वज उभा करण्याची,, आणि अगदी साध्या सोप्या सरळ भाषेमध्ये जीवनाचे तत्वज्ञान माणसाच्या देहात पेरणीच्या माध्यमातून शब्द पेरणाऱ्या "पेरणी "काव्यसंग्रहाच्या कवीराजास पुढील वाटचालीसाठी खूप साऱ्या शुभेच्छा..!


**दामोदर माणिकराव मोरे**
**घाटनांद्रा**
**मो. ९४०३३ ८४८८९**








**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १७ जुलै २०२५

# प्रा.प्रल्हाद ईरबाजी सोनकांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त



गुरे-ढोरे सांभाळत ज्यांनी शिक्षण पूर्ण केले असे प्रा.प्रल्हाद ईरबाजी सोनकांबळे यांचा आज जन्मदिन. त्यांचा जन्म १६ जुलै १९४३ रोजी लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातील डोंगराळ भागात असलेल्या सुल्लाळी या गावी झाला. जळकोट तालुका हा ‘‘उंटाचा डोंगरी तालुका' म्हणून ओळखला जातो. या गावात जाण्यासाठी त्यावेळी रस्ताही नव्हता. लहानपणी त्यांच्या माता-पित्याचे छत्र हरवले व बहिणीने यथाशक्ती त्यांचा सांभाळ केला.मुळातच दुष्काळी आणि अविकसित मराठवाड्यातील ग्रामीण भागात त्यांचे लहानपण गेले. त्यांनी गावाकडेच आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. नंतर पदवीपर्यंतचे महाविद्यालयीन शिक्षण औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयात झाले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून इंग्रजी विषय घेऊन ते एम.ए. झाले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेजमधून त्यांनी एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले.सुरुवातीला वेरूळ जवळील गल्ले बोरगाव येथे ते शिक्षक म्हणून नोकरीला लागले. वर्ष १९६६ मध्ये ते डॉ. आंबेडकर कला आणि वाणिज्य महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले व कालांतराने तेथेच इंग्रजी विभागाचे प्रमुख झाले. महाविद्यालयाचे उपप्राचार्यपद आणि १९८८ मध्ये प्राचार्यपदही त्यांनी भूषविले. गुरे-ढोरे राखणारे प्रल्हादजी त्यांच्या कष्टाने प्राचार्य पदापर्यंत पोहोचले. तेथूनच ते निवृत्त झाले. अगदी शालेय जीवनापासून त्यांना लेखनाची आवड होती.अमेरिकेत गोऱ्यांच्या वांशिक अत्याचाराविरुद्ध जो विद्रोह पुकारला होता त्याचे अभ्यासक डॉ. म. ना. वानखेडे यांनी त्यांना लेखनासाठी प्रोत्साहन दिले. त्यांच्या लिखाणाचा प्रारंभ अस्मितादर्श (त्रैमासिक) मधून झाला. "आठवणींचे पक्षी' हे त्यांचे आत्मचरित्र खूप गाजले. या पुस्तकातून त्यांनी ग्रामीण जीवनातील अनुभव सांगितले आहेत. या आत्मचरित्राचे अकरा भारतीय भाषांमध्ये अनुवाद झाले. याशिवाय "असं हे सगळं', ‘‘पोत आणि पदर' ही त्यांची ग्रंथसंपदा आहे. "आठवणींचे पक्षी' विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात घेतले गेले.साहित्य अकादमीने त्यांच्या कार्याची दखल घेत वर्ष १९८३ मध्ये पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले होते.१९९७ मध्ये शासनाने त्यांचा "आदर्श शिक्षक' म्हणून गौरव केला तसेच "बेस्ट सिटिझन' म्हणून सन्मान झाला. औरंगाबादमध्ये झालेल्या तिसऱ्या दलित साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. "ऑल इंडिया बुद्धिस्ट टीचर्स कॉन्फरन्स' आणि पहिल्या दलित नाट्य महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी त्यांची नियुक्ती झाली होती.लातूर नगरपरिषदेने प्रा. सोनकांबळे यांचा भूमिपुत्र म्हणून विशेष सत्कार केला होता. अंबाजोगाई येथील यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला होता. रयत शिक्षणसंस्थेनेही पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले होते.ते अत्यंत प्रेमळ स्वभावाचे व माणसे जोडणारे होते. त्यांच्या खिशात कायम खडीसाखर असे व समोर भेटण्यास आलेल्या व्यक्तीला हसून आपल्या पिशवीतले सुवासिक फूल व खडीसाखर देऊन तोंड गोड करीत व आपलेसे करीत. सोनकांबळे यांनी त्यांच्या चारही मुलांना, डॉ. अश्वीन, प्रिशीत, मनोज आणि मुलगी डॉ. चेतना यांना उच्चशिक्षित केले. त्यांचे औरंगाबाद इथल्या हॉस्पिटलमध्ये दीर्घ आजाराने वयाच्या ६६व्या वर्षी ६ जानेवारी २०१० रोजी निधन झालं. एक सहृदयी आणि प्रेमळ साहित्यिक अशी त्यांची प्रतिमा होती.

**संकलन प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले**
**श्री. माधवराव पाटील महाविद्यालय, मुरुम ता.उमरगा जि. धाराशीव**

# भंडारा जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक




**भंडारा :** जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक येत्या २७ जुलैला होणार आहे. या निवडणुकीत सहकार पॅनलकडून सर्व २१ जागांवर उमेदवार दिले असून, त्यात महायुतीतील भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) या घटक पक्षांचा समावेश आहे. याबाबत आज, मंगळवारी हॉटेल व्हीके येथे आयोजित पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी तथा माजी आमदार राजेंद्र जैन यांनी सहकार पॅनलच्या उमेदवारांची घोषणा केली.

याप्रसंगी राजेंद्र जैन, सुनिल फुंडे, धनंजय दलाल, राकाँचे जिल्हाध्यक्ष नाना पंचबुद्धे, भाजपचे जिल्हाध्यक्ष आशू गोंडाणे, शिवसेना (शिंदे गटाचे) जिल्हाध्यक्ष अनिल गायधने, आमदार राजू कारेमोरे, माजी खासदार मधुकर कुकडे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व सहकार क्षेत्रातील पुढारी उपस्थित होते.

यावेळी राजेंद्र जैन यांनी सांगितले की, खासदार प्रफुल्ल पटेल, आमदार डॉ. परिणय फुके, आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्या पुढाकाराने महायुतीच्या घटक पक्षांनी सहकार पॅनलद्वारे जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक एकत्र लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबाबत आपसात चर्चा करून सहकार पॅनलचे उमेदवार ठरविले असून, सातही तालुक्यात सहकार पॅनलचे उमेदवार बहुमतांनी विजयी होतील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, आतापर्यंत सुनिल फुंडे यांच्या नेतृत्वात जिल्हा बँकेने मोठी प्रगती केली असून, ही बँक शेतकऱ्यांची बँक असे समिकरण झाले आहे. शेतकरी कर्जवाटप, बँकिंगमधील सुधारणा केल्या आहेत. यापुढेही या बँकेचा आणखी विकास घडवून आणला जाईल, असेही त्यांनी सांगितले. तसेच सुनिल फुंडे यांनी खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या नेतृत्वात महायुतीतील तीनही पक्षांचे उमेदवार सहकार पॅनलमधून दिले आहेत. सातही तालुक्यातील सभासद व मतदारांनी सहकार पॅनलच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

सहकार पॅनलच्या उमेदवारांमध्ये कैलास नशिने, धर्मराव भलावी, सुनिल फुंडे, प्रकाश मालगावे, प्रशांत पवार, प्रदीप पडोळे, संदीप फुंडे, चेतक डोंगरे, योगेश हेडाऊ, आशा गायधने, तिरा तुमसरे, नाना पंचबुद्धे, कवलजितसिंग चड्ढा, विश्वनाथ कारेमोरे, होमराज कापगते, रामदयाल पारधी, अनिल सार्वे, सदानंद बुरडे, जितेश इखार, धर्मेंद्र बोरकर, श्रीकांत वैरागडे यांचा समावेश आहे.

भंडारा जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत इतरही उमेदवार रिंगणात आहेत. त्यामध्ये चंद्रदिन आराम, प्रशांत पडोळे, अजय मोहनकर, अरविंद आसई, नरेंद्र वाघाये, बाळकृष्ण सार्वे, सतीश टिचकुले, शशिकिशोर बांडेबुचे, धनंजय तिरपुडे, सदाशिव वलथरे, संजय केवट, शीला आगासे, सविता ब्राम्हणकर, रसिका भुरे, चंद्रकांत निंबार्ते, विवेक पडोळे, शशांत जोशी, किरण अतकरी, रेखाबाई समरीत, चंपालाल कटरे, रामलाल चौधरी, प्रदीप बुराडे, मोहित मोहरकर, अशोक चोले हे निवडणूक रिंगणात आहेत.

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# मानव-वन्यजीव संघर्षात वाढ



**नागपूर :** राज्यात मानव-वन्यजीव संघर्ष दिवसागणिक वाढत आहे. यात बळी गेलेल्यांच्या वारसांना वन विभाग कोट्यवधींची नुकसानभरपाई देत असल्याचे आकडेवारीवरून समोर आले आहे वन विभागाने गेल्या पाच वर्षात सर्वाधिक २२० कोटी रुपये नुकसानभरपाई २०२४-२५ या वर्षात दिली आहे. त्यामुळे मानव-वन्यजीव संघर्षाच्या वेळीच शास्त्रीय पद्धतीने तोडगा काढण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक असल्याची गरज व्यक्त केली जात आहे.

राज्यात वाघ, बिबट आणि तृणभक्षी प्राण्यांमुळे मानव-वन्यजीव संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली आहे. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मनुष्य मृत्यू, पशुधन हानी आणि शेत पिकांचे नुकसान होते. अशा परिस्थितीत वन विभागाकडून या प्रकरणांमध्ये नुकसानभरपाई दिली जाते. गेल्या पाच वर्षांमध्ये नुकसान भरपाईच्या प्रकरणांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. यासंबंधीची आकडेवारी वनमंत्री गणेश नाईक यांनी विधिमंडळाच्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात पटलावर मांडली. राज्यात वन्यजीवांमुळे झालेल्या नुकसान भरपाईची २०२०-२१ मध्ये ४४ हजार ६९२, २०२१-२२ मध्ये ४७ हजार २८३, २०२२-२३ मध्ये ५४ हजार ५८८, २०२३-२४ मध्ये २ लाख ३७ हजार ८४१ आणि २०२४-२५ मध्ये १ लाख ८६ हजार ४६ अशी एकुण ४ लाख ०३ हजार ०५० प्रकरणे नोंदवण्यात आली.

या प्रकरणांमध्ये २०२०-२१ मध्ये ८० कोटी, २०२१-२२ मध्ये ८० कोटी, २०२२-२३ मध्ये १२७ कोटी, २०२३-२४ मध्ये १४५ कोटी आणि २०२४-२५ मध्ये २२० कोटी रुपयांची भरपाई देण्यात आली. गेल्या पाच वर्षात २०२४-२५ साली सर्वाधिक नुकसान भरपाईची रक्कम वन विभागाने अदा केली आहे. यामुळे राज्यात मानव-वन्यजीव संघर्ष वाढत असल्याचे नुकसान भरपाईच्या वाढलेल्या आकड्यावरून स्पष्ट होत आहे. राज्यात सध्या वाघ आणि बिबट्यांमुळे होणाऱ्या मानवी मृत्यूत वाढ झाली आहे. एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात १ जानेवारी ते ११ मे या कालावधीत वाघाच्या हल्ल्यात १३ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. तर काळवीट, नीलगाय, माकड, हत्ती, रानडुक्कर या प्राण्यांमुळे शेत पिकांचे नुकसान होते..

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १७ जुलै २०२५


## समुद्रातील पाण्यातून मीठ, खारटपणा व क्षार काढून पिण्या योग्य व सिंचना साठीची प्रक्रिया (डिसॅलिनेशन) शाश्वत विकास करेल - राजेंद्र दाते पाटील





**मुंबई (प्रतिनिधी)** समुद्रातील खारटपणा काढण्याची प्रक्रिया" किंवा "पाण्याचे निर्लवणीकरण" म्हणजे 'डिसॅलिनेशन'.असुन समुद्रातील पाण्यातून मीठ,खारट व क्षार काढून ते पाणी पिण्यायोग्य किंवा सिंचनासाठी योग्य बनवण्याची प्रक्रिया (डिसॅलिनेशन) शाश्वत विकास करेल असे प्रतिपादन जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले. या साठी महाराष्ट्र शासनाने प्रचंड परिश्रम घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,अजित दादा पवार व पारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांना सर्व कस पणाला लावावा लागेल असे प्रतिपादन पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव व जेष्ठ जलतज्ञ डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी आमच्या प्रतिनिधी सोबत विशेष बातचीत करताना या अत्यंत क्लिष्ट व अभ्यासु बाबी नमुद केल्या.पुढे अधिकची सविस्तर माहिती देताना ते म्हणाले की, डिसॅलिनेशन म्हणजे समुद्रातील किंवा खारट पाण्यातून मीठ आणि इतर क्षार काढून ते पाणी पिण्यायोग्य किंवा सिंचनासाठी योग्य बनवण्याची प्रक्रिया आहे. मराठीत या प्रक्रियेला 'समुद्रातील खारटपणा काढण्याची प्रक्रिया' किंवा 'पाण्याचे निर्लवणीकरण' (डिसॅलिनेशन) असे म्हणतात. यात समुद्राच्या पाण्याचे शुद्धीकरण केले जाते, ज्यामुळे ते पिण्यासाठी आणि शेतीसाठी वापरले जाऊ शकते.सध्या रशियन शास्त्रज्ञ उच्च- तापमान, कमी-शक्तीचे थोरियम अणुभट्ट्या विकसित करत आहेत, ज्यामध्ये वीज आणि उष्णता निर्माण करण्यासाठी थोरियम आणि शस्त्रास्त्र- दर्जाच्या प्लुटोनियमचे मिश्रण वापरण्याची शक्यता आहे. या अणुभट्ट्या हायड्रोजन उत्पादन आणि पाण्याचे निर्लवणीकरण (डिसॅलिनेशन) करण्यासाठी देखील वापरल्या जाऊ शकतात. हा प्रकल्प सोव्हिएत काळातील संचित प्लुटोनियम वर आधारित आहे, जो साठवणे आणि पुनर्प्रक्रिया करणे महाग आहे.थोरियम आणि प्लुटोनियम अणुभट्ट्या थोरियम आणि शस्त्रास्त्र-दर्जाच्या प्लुटोनियमचे मिश्रण वापरतात,ज्यामध्ये प्लुटोनियम अणु अभिक्रिया सुरू करण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी विखंडन पदार्थ म्हणून काम करते. उच्च- तापमान, कमी-शक्ती: हे अणुभट्ट्या उच्च-तापमान आणि कमी-शक्तीच्या बनवण्या साठी डिझाइन केल्या जात आहेत,ज्यामुळे ते वीज निर्मितीच्या पलीकडे विविध अनुप्रयोगांसाठी योग्य बनतात. पाण्यावर स्वतंत्र शीतकरण पारंपारिक अणुभट्ट्यांप्रमाणे, हे थोरियम अणुभट्ट्या शीतलक म्हणून हेलियम, कार्बन डायऑक्साइड किंवा हायड्रोजन वापरू शकतात, ज्यामुळे नद्या किंवा इतर स्रोतांमधून पाण्याची गरज कमी होते. कचरा कमी करणे : थोरियम-आधारित अणुभट्ट्यां मधून युरेनियम-आधारित अणुभट्ट्यांच्या तुलनेत कमी काळ टिकणारा किरणोत्सर्गी कचरा निर्माण होण्याची अपेक्षा आहे.हायड्रोजन उत्पादन आणि निर्लवणीकरण(डिसॅलिनेशन) या अणुभट्ट्यांद्वारे निर्माण होणारी औष्णिक ऊर्जा हायड्रोजन उत्पादन व समुद्राच्या पाण्याचे डिसॅलिनेशन करण्यासाठी वापरली जाऊ शकते, ज्यामुळे ऊर्जा आणि जल सुरक्षेसाठी संभाव्य उपाय उपलब्ध होतात. महाराष्ट्र सहयोग: भारतातील महाराष्ट्र राज्य थोरियम इंधनावर आधारित एक लहान मॉड्यूलर अणुभट्टी विकसित करण्यासाठी "रशियाच्या रॉस्टम नामक संस्थेसोबत " भागीदारी करत आहे,ज्याचे उद्दिष्ट व्यापारीकरण आणि स्थानिक असेंब्ली आहे. डिसॅलिनेशन ही एक प्रक्रिया आहे जी खाऱ्या पाण्यातील खनिज घटक काढून टाकते.सामान्यत, डिसॅलिनेशन म्हणजे पदार्थातील क्षार आणि खनिजे काढून टाकणे. एक उदाहरण म्हणजे मातीचे डिसॅलिनेशन.हे शेतीसाठी महत्वाचे आहे.मानवी वापरासाठी किंवा सिंचनासाठी पाणी तयार करण्यासाठी खाऱ्या पाण्याचे, विशेषतः समुद्राच्या पाण्याचे डिसॅलिनेशन करणे शक्य आहे.डिसॅलिनेशन प्रक्रियेचे उप-उत्पादन म्हणजे खारे पाणी. अनेक समुद्री जहाजे आणि पाणबुड्या डिसॅलिनेशन वापरतात. डिसॅलिनेशन मध्ये आधुनिक रस प्रामुख्याने मानवी वापरासाठी गोड्या पाण्याच्या किफायतशीर पुरवठ्यावर केंद्रित आहे.डिसॅलिनेशन केलेल्या सांडपाण्यासोबत ते पावसा पासून स्वतंत्र असलेल्या काही जलस्रोतांपैकी एक आहे.बार्सिलोना,स्पेनमधील रिव्हर्स ऑस्मोसिस डिसेलिनेशन प्लांटत्याच्या ऊर्जेच्या वापरामुळे,समुद्राच्या पाण्याचे क्षारीकरण करणे हे पृष्ठभागावरील किंवा भूजलातील गोड्या पाण्यापेक्षा,पाण्याचे पुनर्वापर आणि जलसंवर्धनापेक्षा सामान्यतः जास्त महाग असते ;तथापि, हे पर्याय नेहमीच उपलब्ध नसतात आणि साठ्यातील घट ही जग भरातील एक गंभीर समस्या आहे. जे मोठ्या प्रमाणात डिसॅलिनेशन पायाभूत सुविधांचे वाढते महत्त्व दर्शवते.अशी जगाची स्थिती असुन महाराष्ट्र शासनाने आता अधिकची प्रगती पिण्याचे पाणी व सिंचनासाठी लागणाऱ्या पाण्यासाठी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रचंड परिश्रम तथा मेहनत घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,अजितदादा पवार आणि पारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांना सर्व कस पणाला लावावा लागेल. या प्रकल्पासाठी समन्वय आणि संशोधन सुलभ करण्यासाठी एक संयुक्त कार्यगट स्थापन करण्याची गरज असुन प्रकल्पाच्या अंमल बजावणीत स्वारस्य दर्शविणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी महाजेनको, रोसाटॉम ऊर्जा प्रकल्प,मित्रा आणि ग्लोबल तंत्रज्ञान आघाडी यांच्या सह या क्षेत्रात कार्यरत एन जी ओ यांची मदत घेऊन नव्हे या स्वयंसेवी संस्थेचा सहभाग आवश्यक ठरणार असुन अंमलबजावणी दरम्यान भारत सरकारने अणुऊर्जेसाठी घालून दिलेल्या सर्व कायदेशीर तरतुदी आणि सुरक्षा प्रोटोकॉलचे काटेकोरपणे पालन केल्यास समुद्राचे क्षार युक्त खारट पाणी पिण्यासाठी व सिंचना साठी लिलया पद्धतीने हा " गेम चेंजर " प्रकल्प ठरू शकतो असे आग्रही प्रतिपादन पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव व जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

## उत्तम योजनांचा फक्त गाजावाजा; बेजबाबदार अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे नागरिकांची फसवणूक



**मुरुम, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** राज्य शासनाच्या श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान अंतर्गत ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांना थेट लाभ देण्यासाठी अनेक चांगल्या योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. रहिवाशी दाखले, उत्पन्न व जातीचे दाखले, रेशन कार्ड, सात-बारा उतारे, फेरफार नोंदी, संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान योजना, विद्यार्थ्यांसाठी व महिलांसाठी विविध सवलती या सर्व योजना समाजहिताच्या आणि खरंच उपयुक्त आहेत. परंतु या चांगल्या योजनांच्या अंमलबजावणीत मुरुम येथील प्रशासनाने अक्षरशः नागरिकांची थट्टा केली आहे. शहरातील रत्नमाला मंगल कार्यालयात आयोजित शिबिरात बुधवारी (ता. 16) रोजी नायब तहसीलदार भीमाशंकर बेरूळे, मंडळ अधिकारी सुहास जेवळीकर, मुरुम मंडळ अधिकारी वैजनाथ माटे, तलाठी सुरेश खरात आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी सत्कार, भाषणे आणि फोटोसेशनवर भर दिला गेला. नागरिकांनी मोठ्या आशेने गर्दी केली होती, मात्र प्रत्यक्षात फक्त आधार सीडिंग या एका कामापुरतेच शिबिर मर्यादित राहिले. तेही केवळ अर्ध्या तासात तांत्रिक अडचणी सांगून बंद करण्यात आले. त्यानंतर सभागृहाचे दरवाजे बंद करून केवळ एका तासात शिबिर संपल्याची घोषणा करण्यात आली आणि नागरिकांना अक्षरशः बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. अनेक नागरिकांचे अर्ज, दाखले, फेरफार नोंदी आणि इतर तक्रारी हाताळल्या देखील गेल्या नाहीत. उपस्थित पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रश्न सोडवण्याचा आटोकाट प्रयत्न केला, परंतु प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे सर्व काही व्यर्थ ठरले. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या सगळ्यावर तहसीलदारांना कोणतीच माहिती नसल्याचे समजले आणि कार्यक्रमाबाबत मोघम उत्तरे देऊन जबाबदारी झटकली. नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया देताना म्हटले, जर योजना राबवायच्या नसतील, तर अशा शिबिरांमुळे आम्ही का फसावयाचे ? काहींनी प्रशासनाच्या फोटोसेशनवर प्रश्न उपस्थित केला. हे फोटो केवळ कागदावर यश दाखवण्यासाठी वापरणार का ? यामुळे एक मोठा प्रश्न उपस्थित झाला. तहसीलदार व संबंधित अधिकारी आता हे शिबिर योग्य नियोजन करून, पारदर्शकतेने पुन्हा राबवतील का ? की यावरही पडदा टाकून, गप्प बसतील ? या ढोंगी अंमलबजावणीमुळे शासनाच्या उत्तम योजनांवर लोकांचा विश्वास उडत चालला आहे, हे दुर्दैवी वास्तव ! आता तरी प्रशासनाला जाग येईल का, की पुन्हा एकदा नागरिकांना फसवण्याचा कट रचला जाणार ?


